# कोरोना कालावधीतील शैक्षणिक पर्यावरण

**डॉ. आर. के. शानेदिवाण.** प्राचार्य, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर.

.........................................................................................................................................

एकविसाव्या शतकाची सुरुवात असाधारण स्वरूपाची असेल असे अनेक विद्वानांचे मत होते. आज जेव्हा वैज्ञानिक प्रगतीचा आढावा घेण्यात येतो तेव्हा ही बाब निश्चितपणे अनुभवता येते. मानवी विचार, संकल्पना आणि उपलब्ध तंत्रज्ञानाच्या साह्याने आतापर्यंतची सर्वात मोठी वैज्ञानिक झेप मानवाने घेतली. असे वाटत होते की मनुष्य सर्वकाही आपल्या कवेत घेतो आहे. अर्थात याला मानवाच्या आकलनाचा आधार होता. हे सर्व घडत असतानाच गेल्या सहा महिन्यांमध्ये मानवी अस्तित्वालाच धोका निर्माण करणारा, एक सामान्य नजरेला न दिसू शकणारा, विषाणू निर्माण झाला आणि संपूर्ण मानवी समूहाची आपले अस्तित्व टिकवण्यासाठी धडपड सुरू झाली. या विषाणूचे नाव आज कळत्या वयापासून ते अगदी शंभर वर्षाहून अधिक वय असणाऱ्या व्यक्तीच्या मुखावर आहे. या विषाणूचे नाव कोरोना असे आहे. शास्त्रीय भाषेत कोविड १९ या नावाने या विषाणूला जगभर ओळखले जाते. कोविड-१९ या विषाणूचा आजच्या परिस्थितीत नेमका मानवी जीवनाच्या कोणकोणत्या विभागावर परिणाम झाला आहे याची सर्वदूर चर्चा सुरू आहे. अशा परिस्थितीत भारतीय परिप्रेक्ष्यावर या कोरोना विषाणूने कसा प्रभाव सोडलेला आहे व त्यामुळे मानवाची भविष्यकालीन वाटचाल कशी असेल याचा किमान स्वरूपाचा अंदाज करता येऊ शकतो.

साधारणपणे डिसेंबर २०१९ च्या अखेरच्या टप्प्यात या विषाणूचा प्रथम अनुभव चीन या देशात आला. त्यापुढील एक महिन्याच्या काळात या विषाणूने चीन देशातील वूहान शहराला पूर्णपणे वेढले. आपल्या देशात कोरोना विषाणू ३० जानेवारीच्या दरम्यान नोंदविला गेला. केरळ राज्यामध्ये एका व्यक्तीला या विषाणूची लागण झाल्याचे वैद्यकीय अहवालावरून स्पष्ट झाले. यापुढील पाच महिन्यांमध्ये आपल्या देशातील जवळ जवळ सहा लाख लोकांना कोरोना विषाणूची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. आज मानवी जीवनाचे प्रत्येक अंग कोरोनाच्या प्रादुर्भावाने प्रभावित झाला आहे. सर्व शासकीय, निमशासकीय यंत्रणा कोरोणा कसा आटोक्यात येईल यादृष्टीने प्रयत्न करीत आहेत. अशावेळी पाच महिन्याच्या कालावधीनंतर आपली नेमकी स्थिती कशी आहे याचा शोध घ्यावयास हवा.

जे विभाग सर्वाधिक प्रभावित झाले आहेत अशा विभागांमध्ये शैक्षणिक विभाग प्राधान्याने येतो. याचे कारण शासकीय धोरणाचा परिणाम सर्वप्रथम शैक्षणिक कामकाजावर झाला. विशेषत: महाराष्ट्राचा विचार केला तर १७ मार्च रोजी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रव्यापी लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेतला. हा अनुभव नवा होता. संपूर्ण महाराष्ट्र बंद झाला. हे बंद होणे केवळ काही विभागापुरते मर्यादित नव्हते तर सगळ्या विभागावर याचा परिणाम झाला. २३ तारखेला राष्ट्रीय स्तरावर यासंदर्भातील हालचाली सुरू झाल्या. आणि भारत सरकारने २४ मार्च रोजी देशव्यापी लॉकडाऊन किंवा टाळेबंदी जाहीर केली. संपूर्ण देश एका क्षणात बंद झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. टाळेबंदी होत असताना याचा कालावधी किती असेल याचा अंदाज नेमकेपणाने येत नव्हता. त्यामुळे सुरुवातीच्या काळात या ताळेबंदीकडे नाविन्य म्हणून पाहिले गेले. अर्थात ही अवस्था फार काळ टिकली नाही. कारण महाराष्ट्र शासनाने लगेचच दहावीच्या परीक्षा थांबवण्याचा निर्णय घेतला. पाठोपाठ विद्यापीठस्तरीय परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि खऱ्या अर्थानं शैक्षणिक वर्तुळात 'पुढे काय?' अशी चर्चा सुरू झाली. असे वाटत होते की टाळेबंदी लवकरच संपेल आणि शैक्षणिक वातावरण पुन्हा सुरळीत होईल, पण असे झाले नाही. आणि आता तर दहावीचे पेपर जे झाले नव्हते ते रद्द करण्यात आले आणि त्याचबरोबर विद्यापीठ स्तरावर पदवी आणि त्यापुढील पदव्युत्तर परीक्षा सुद्धा होणार नाहीत असा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाच्या पाठीमागे शासनाकडे उपलब्ध असणारी कोरोना संदर्भातील माहिती, त्याचा होत असलेला प्रसार, त्यातून निर्माण होणारी परिस्थिती, या सर्व गोष्टी कारणीभूत असणार आहेत. पण याचा जो दीर्घकालीन परिणाम शैक्षणिक व्यवस्थेवर होणार आहे त्याची चिंता अनेक पातळीवर सुरू झाल्याचे दिसून येते.

यासंदर्भात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि पदवी-पदव्युत्तर अशा दोन वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये विचार करता येईल. प्राथमिक ते उच्च माध्यमिक या शाळातील विद्यार्थ्यांना सरसकट पास करण्याचा निर्णय झाला. त्यामुळे पहिली ते नववी चे विद्यार्थी वरच्या वर्गात गेले, ११ वी चे विद्यार्थी बारावीच्या वर्गात गेले आणि प्रवेश प्रक्रियेचा पहिला भाग पहिल्या टप्प्यात सुखकर करण्यात आला. परंतु केवळ प्रवेश निश्चितच झाले याचा अर्थ शैक्षणिक प्रक्रिया सुरळीत झाली असे होत नाही. अशावेळी 'शो मस्ट गो ऑन' या तत्त्वाचा विचार करून काही शिक्षण तज्ञांनी ऑनलाइन शिक्षणाचा प्रयोग करायला हवा असा विचार मांडून त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. हा विचार नव्या युगाचा म्हणून स्वीकारता येईलही. परंतु भारतासारख्या

खंडप्राय देशामध्ये खेड्यापाड्यामध्ये राहणारा विद्यार्थी, त्याची व पालकांची आर्थिक स्थिती, इंटरनेट त्याला उपलब्ध होणे, त्याला अँड्रॉइड किंवा स्मार्टफोन उपलब्ध होणे या सर्व गोष्टी विचारात न घेता, ऑनलाइनची प्रक्रिया सुरू करावी असे सर्वांनी स्वीकारल्याचे चित्र निर्माण झाले. गेले काही दिवस ही प्रक्रिया सुरू आहे. परंतु ज्या विद्यार्थ्यांसाठी ही सर्व प्रक्रिया सुरू आहे त्या विद्यार्थ्यांचा अनुभव मात्र निराश करणारा आहे. कारण ऑनलाइन प्रक्रियेमध्ये पटावरील विद्यार्थी संख्येच्या केवळ ४५ टक्केच विद्यार्थी हजर असतात असे एका सर्वेक्षणावरून दिसून आले. (दै. सकाळ, दि. ६ जुलै २०२०) त्यामध्येही मोबाईल त्या वेळेत उपलब्ध असणे ही गोष्टही फार महत्त्वाची ठरू लागली आहे. त्यामुळे ऑनलाईन शिक्षणाची ही प्रक्रिया एका विशिष्ट मर्यादेपलीकडे यशस्वी होईल असे आज तरी दिसत नाही. याचाच एक दुसरा भाग म्हणजे विद्यार्थ्यांना व्हिडिओ पाठवून अभ्यास अंतर्गत घटकांचा होमवर्क सारखा अभ्यास देणे. ही प्रक्रिया अधिक विश्वासपूर्ण आहे. कारण दिलेला व्हिडिओ दिवसभरात किंवा पुढे कितीही वेळा पाहता येतो.

असे जरी असले तरी या परिस्थितीत लहान मुलांच्या शारीरिक, भावनिक व मानसिक अंगावर परिणाम जाणवत आहे. कोरोनापूर्व काळात विद्यार्थ्याने विशेषत: शालेय स्तरावरील विद्यार्थ्याने मोबाईलचा वापर कमीत कमी करावा किंवा करूच नये या दृष्टिने शिक्षक व पालकांचा आग्रह असायचा. पण आज परिस्थिती नेमकी उलट होत आहे. मुलांना मोबाईल पाहण्यासाठी पालक व शिक्षक दबाव वाढवत असल्याचे चित्र सगळीकडे दिसत आहे. याचा परिणाम असा होत आहे की मुले तासन्तास मोबाईल, लॅपटॉप किंवा संगणकासमोर बसून आहेत. त्यांच्या शारीरिक हालचालीवर मर्यादा येत आहेत. अनेक मुलांच्या दृष्टीवर परिणाम झाला आहे. अनेकांच्या मानेची हालचाल करताना वेदना होत आहेत. ही तर केवळ सुरूवात आहे. पुढील काळात या व्याधी वाढल्या तर पालकांच्या समोर मुलाच्या भविष्याचा प्रश्न आ वासून उभा राहिल. याचा अर्थ ऑनलाइन प्रक्रियेमुळे काही काळ विद्यार्थ्यांना अध्यापन केल्याचे समाधान वाटत असले तरी शिक्षणाचा मूळ हेतू यातून साध्य होईल असे नाही. दुसरे असे की, ऑनलाइन शिक्षणाचे शैक्षणिक पर्यावरण आपल्याकडे उपलब्ध नाही. पाश्चात्य राष्ट्रांमध्ये ही प्रक्रिया खूप पूर्वीपासून सुरू आहे, ती त्यांनी सहेतुक स्वीकारली आहे. आपण मात्र नाईलाजाने या प्रक्रियेकडे जात आहोत. स्वाभाविकपणे या प्रक्रियेतील गुणात्मकतेची चर्चा होऊनच त्याचे लाभ पुढीलकाळात दिसून येतील.

विद्यापीठ स्तरावर नवीनच प्रश्न निर्माण झाले आहेत. जे विद्यार्थी तीन वर्षाच्या कोर्सला आहेत आणि ज्यांच्या या पदवीच्या कालावधीचा अंतिम टप्पा किंवा सत्र आहे त्यांच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय झाला. (शासन निर्णय दि. १९ जून २०२०) यामुळे काही विद्वानांच्या मते विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. त्यामुळे त्यांनी परीक्षा घेणे संयुक्तिक असल्याचे म्हटले. विद्यार्थ्यांचा निकाल त्याच्या मागील परीक्षातील परफॉर्मन्स वरून देण्यात यावा असाही विचार पुढे येत आहे. त्यातूनही अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होत आहेत. विशेषत: ज्या विद्यार्थ्यांचे मागील परीक्षेत विषय राहिलेले आहेत किंवा जे परीक्षेला बसलेले नाहीत त्या विद्यार्थ्यांना सरासरी गुण कसे द्यायचे हा मोठाच प्रश्न आहे. त्याचबरोबर विज्ञान शाखेकडे विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक घेणे, प्रोजेक्ट घेणे, जर्नल तपासणे, मौखिक परीक्षा घेणे या प्रक्रिया कशा रीतीने हाताळायच्या यासंदर्भात ही कमालीची संभ्रमावस्था दिसते आहे. या क्षणी तरी चित्र धूसर आहे. अनेक विद्वान, जे काही शैक्षणिक प्रक्रियेमध्ये सुरू आहे त्यासंदर्भात काहीही न बोलता पुढे काय होते हे पाहताना दिसतात.

विद्यापीठ स्तरावर मूल्यांकन न झाल्यामुळे पुढील काळात नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी समस्या निर्माण होऊ शकतील अशी साधार भीती व्यक्त होत आहे. काहीना तर असे वाटते की आपल्या प्रशस्तीप्रत्रावर 'कोरोना कालखंड' असा शिक्का पडल्यामुळे मानसिक खच्चीकरण होईल. देशविदेशामध्ये उच्चशिक्षणासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना याचे भय अधिक वाटते आहे. ही मानसिक स्थिती स्वाभाविकता म्हणून स्वीकारली तरी शासन स्तरावरील निर्णयाचाही विचार करावयास हवा. विद्यार्थ्यांचे मूल्यांकन होऊच नये अशी सरकारची भूमिका नाही पण विद्यार्थ्यांच्या आरोग्यापेक्षा परीक्षा महत्त्वाची आहे काय? हा प्रश्न आज ऐरणीवर आहे. कोरोनाच्या प्रसाराची तीव्रता दिवसेंदिवस वाढते आहे. ५ जुलैच्या नोंदीनुसार रोज सरासरी २० ते २२ हजार कोरोना बाधितांची नोंद होत आहे. देश, राज्य, शहरे समूह संसर्गाच्या काठावर आहेत. काही ठिकाणी तर समूह संपर्क सुरूही झाला आहे. अशावेळी हजारो विद्यार्थी एकत्र आणून धोका पत्करायचा काय? हाच मोठा प्रश्न आहे. सरकारने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला महत्त्व दिले कारण 'जगणे' हीच गोष्ट अंतिमत: महत्त्वाची ठरते. परीक्षा किंवा मूल्यांकनाच्या पद्धती पुढे मागे करता येतील... किंवा त्या रद्द केल्यातरी फारसे नुकसान होणार नाही. हे असे म्हणण्यापाठीमागे कर्नाटक राज्याने १० वी परीक्षा घेण्याचे निश्चित करून परीक्षा सुरू केल्या आणि वर्गच्या वर्ग कोरोना बाधित झाल्याचे समोर आले. याचा अर्थ कोणताही निर्णय सवंगपणे किंवा भावनेच्या आहारी जाऊन घेणे मुलांच्या जीवावर बेतू शकते हे यामुळे लक्षात येते.

आज या क्षणाला महाराष्ट्र, ओडीसा, प. बंगाल, पंजाब या सरकारानी विद्यापीठस्तरीय परीक्षांचे आयोजन होणार नाही असे जाहीर करून विद्यार्थी आरोग्याला सर्वाधिक महत्त्व दिल्याचे समजून येते.

विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका या संदर्भात अजूनही धरसोडपणाचीच वाटते. लॉकडाऊनच्या पहिल्या कालावधीतच यु.जी.सी.ने मार्गदर्शक सूचनांच्या आधारे जर परीक्षांसंदर्भातील निर्णय जाहीर करून त्यावर अंतिम मोहोर लावली असती तर कदाचित परीक्षांच्या संदर्भात होत असलेला गोंधळ टाळता आला असता. सुरूवातीला संबंधित राज्याच्या सरकारानी निर्णय घ्यावा, असे निर्देश दिल्यानंतर सातत्याने यामध्ये बदल होत राहिले. दरम्यानच्या कालावधीत कुलपती या नात्याने महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व सरकार यांमध्ये संघर्ष सुरू झाला. कुलपतींच्या म्हणण्यानुसार महाराष्ट्र शासनाने त्यांच्या अधिकारावर आक्रमण केले आहे. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्र शासनाने निर्णयाचा फेरविचार करावा असे निर्देश दिले. तरीही महाराष्ट्र शासन आपल्या भूमिकेवर ठाम राहिले व त्यांनी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय अंतिमत: जाहीर केला. दरम्यानच्या काळात या संदर्भात मार्गदर्शन व्हावे, असे यु.जी.सी. कडे पत्र पाठविण्यात आले आणि यु.जी.सी.ने परीक्षा घ्यायला हव्यात असा निर्णय दिला. (दि. ७ जुलै २०२०)

खरं तर हा प्रश्न विद्यापीठीय स्तरावर अधिक सुरळीतपणे हाताळता आला असता. परंतु या प्रश्नांच्या अनुषंगाने राजकीय पातळीवर झालेला हस्तक्षेप नकळतपणे या प्रश्नाचे किंवा प्रश्नाचा गुंता वाढविण्यात कारणीभूत ठरतो की काय असे वाटू लागले आहे. ही सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर एकूणच शैक्षणिक पर्यावरणाचा विचार गंभीरपणे करण्याची वेळ आलेली आहे असे निश्चितपणे वाटते.गेल्या पाच महिन्याच्या कालावधीत कोरोनाने मानवी जीवनाला अजस्त्र विळखा घातला आहे. या विषाणूचे अस्तित्व कुठपर्यंत राहणार हे आज कुणीही छातीठोकपणे सांगू शकत नाही. या सर्व परिस्थितीमध्ये एक बाब निश्चितपणे लक्षात येते की भविष्याचा मानबिंदू म्हणून ज्या विद्यार्थ्यांचा विचार केला जातो त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक विश्व नकळतपणे दुर्लक्षिली जाते आहे की काय असे वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण होत आहे. यातून अनेक मानसिक समस्याही निर्माण होत आहेत. एक तर गेल्या चार पाच महिन्याच्या कालावधीमध्ये एका अनामिक स्वरूपाच्या भीतीने घेरले आहे. मुलांच्या विचार केला तर त्यांनाही ही सक्तीची सुट्टी आता नकोशी झाली आहे. शिक्षकांच्या संदर्भात तर त्याहीपेक्षा वेगळे प्रश्न निर्माण होताहेत. एक तर नवी शैक्षणिक प्रक्रिया त्यांना माहीत नाही किंवा त्याचा अंगीकार त्यांनी आतापर्यंत केला नाही. ही परिस्थिती स्वीकारणे त्याना जड जात आहे. त्यांच्यावर नकळतपणे दबाव येत आहे. असे अनेक शिक्षक, प्राध्यापक आहेत की ज्यांना आजही नीटपणे संगणक हाताळता येत आहे. अशा परिस्थितीत त्यांच्यावर असणारे मानसिक दडपण दिवसेदिवस वाढत आहे. शाळा महाविद्यालय सुरू व्हावेत अशी त्यांची मनापासून इच्छा आहे. पण परिस्थिती या इच्छेला लगाम घालताना दिसत आहे. पुढील काळात या सर्व परिस्थितीचा विचार करून शैक्षणिक पर्यावरण अधिकाधिक स्वच्छ, स्पष्ट होण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावयास हवेत. कोरोनाच्या या संकटाच्या कालावधीतून आपण येत्या काही दिवसात, कदाचित महिन्यात आपण बाहेर पडू पण या कालावधीमध्ये शैक्षणिक पर्यावरणाचा झालेला ऱ्हास आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्यावर झालेला नकारात्मक परिणाम दीर्घकाळ राहू नये या दिशेने प्रयत्न करावयास हवा. असे झाले नाही तर याचे परिणाम पुढील पिढ्यांच्यावरती परिणाम करणारे असू शकतील अशी भीती मात्र निश्चितपणे वाटते आहे.

कोरोनाने मानवी जीवनाच्या प्रत्येक घटकावर परिणाम केला आणि त्यातल्या त्यात शिक्षणावरील हा परिणाम, दीर्घकाळ प्रभाव सोडणार आहे. खरंतर शिक्षणाने भविष्याचं स्वप्न साकार करायची संधी विद्यार्थ्याला मिळत असते. पण आज, कारण काही का असेना नकळतपणे त्यांच्याकडे थोडेसे दुर्लक्ष होते की काय असे वाटत आहे. ही परिस्थिती जेवढ्या लवकर पूर्वपदावर आणता येईल तेवढ्या लवकर आणायला हवी, अन्यथा इतिहास आपल्याला माफ करणार नाही.

**संदर्भ सूची :**

१) दै. सकाळ, दि. ६ जुलै २०२०.
२) महाराष्ट्र शासन निर्णय, दि. १९ जून २०२०.
३) यु.जी.सी. परिपत्रक, दि. ७ जुलै २०२०.